अपिल प्राधिकारी तथा मुख्य अभियंता
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक : माअ/पापु ४९
दिनांक :- २५/६/२०१७

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपील**

**अपिलार्थी**
श्री.प्रकल्प शिवाजीराव ताम्हाणे
मीरा हौसिंग सोसा., फ्लॅट नं.२१३, बिल्डींग नं.१२,
सॅलसबरी पार्क, पुणे - ४११०३७.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी
लष्कर पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

## विवेचन

अर्जदार श्री.प्रकल्प शिवाजीराव ताम्हाणे, मीरा हौसिंग सोसा., फ्लॅट नं.२१३, बिल्डींग नं.१२, सॅलसबरी पार्क, पुणे - ४११०३७. यांनी अपिल केलेले आहे. त्यासाठी त्यांना दि.२०/०६/२०१७ रोजी अपिलाची तारीख देण्यात आली होती.

सदर अपिल सुनावणीस अपिलार्थी श्री.प्रकल्प शिवाजीराव ताम्हाणे, मा.कार्यकारी अभियंता व मा.कनिष्ठ अभियंता, लष्कर पाणीपुरवठा पुणे मनपा हे उपस्थित होते. सदर सुनावणीत पुढील प्रमाणे आदेश देण्यात आले.

# " सुनावणी आदेश "

अर्जदार श्री.प्रकल्प शिवाजीराव ताम्हाणे यांनी दि.२५/०५/२०१७ रोजी या कार्यालयाकडे माहिती अधिकारांतर्गत अपिल अर्ज केला होता. याबाबत अर्जदारास दि.२०/०६/२०१७ रोजी बोलविण्यात आले. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही संकेत स्थळावर असल्याचे सांगण्यात आले. परंतु अपिलार्थीने मला संगणक ऑपरेट करता येत नसल्याचे सांगितले. तेव्हा संकेत स्थळावरील उपलब्ध माहिती ही अपलोड करुन अपिलार्थीच्या संगणकावर देण्यात येईल. व त्या व्यतीरिक्त अर्जदारास हव्या असलेल्या माहितीसाठी दि.२१/०६/२०१७ रोजी लष्कर विभागाकडील साईट ऑफिसवर येऊन अर्जदारास आवश्यक असणाऱ्या माहितीच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन देणेबाबत मा.कार्यकारी अभियंता व मा.कनिष्ठ अभियंता यांना आदेश देण्यात आले.

तरी वरील सर्व बाबींचा विचार करता आपले अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रविण गेडाम)
(मो.नं.९६८९९३१९२६)
अपिल प्राधिकारी तथा
अधिक्षक अभियंता (लष्कर)
पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका
०५०८ प्रत

**टिप :-** वरील आदेश अपिलार्थीस मान्य नसल्यास द्वितीय अपिल मा.कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला विधानभवन समोर, पुणे १. येथे अपिलाचा निकाल मिळल्यापासून ९० दिवसांमध्ये करु शकतील.

**प्रत :-** मा.जनमाहिती अधिकारी
लष्कर पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका